धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डुप्लीकेट आधारवरून बँक फसवणुकीचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

डुप्लीकेट आधार कार्ड तयार करून बँकेची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी तुळजापूर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

हनमंत दगडू घोडगे (वय ७०) व मनीषा संदीप गायकवाड (वय २५, दोघे रा. कामटी, ता. ग्रामीण सोलापूर) अशी आरोपींची नावे आहेत.

त्यांनी ३० मार्च रोजी दुपारी १२.१५ वाजता एसबीआय बँक, नळदुर्ग रोड शाखा तुळजापूर येथे संगनमत करून दुसऱ्या खातेदाराच्या नावाचे डुप्लीकेट आधार कार्ड तयार करून केवायसी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.




त्यानंतर डुप्लीकेट पासबुक मिळवून शिवाजी बाबुराव उळेकर यांच्या खात्यातील रक्कम काढण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र बँक कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी ओमकार धोंडीराम कांबळे (वय २७) यांच्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुळजाभवानी देवीच्या चैत्र पौर्णिमा उत्सवासाठी व्यापक तयारी

### शहर स्वच्छता व भाविकांच्या सुरक्षेवर भर

**सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींचा चैत्र पौर्णिमा उत्सव यंदा दिनांक ३० मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. चैत्र यात्रेच्या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथे लाखो भाविकांची गर्दी अपेक्षित असल्याने श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने चैत्र यात्रेची आवश्यक तयारी करण्यात आली आहे.

उत्सव कालावधीत ३१ मार्च, १ एप्रिल व २ एप्रिल रोजी देवीची पारंपरिक छबीना मिरवणूक काढण्यात येणार असून, १ एप्रिल रोजी देवीचा जोगवा असणार आहे. भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पोलिस विभाग, आरोग्य विभाग व नगरपालिका प्रशासन यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. मंदिराकडे येणाऱ्या सर्व प्रमुख मार्गावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून, उन्हापासून संरक्षणासाठी सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे.



भाविकांची गर्दी लक्षात घेता दि. ३१ मार्च ते ५ एप्रिल २०२६ या कालावधीत सर्व भाविकांना बीडकर पायऱ्या मार्गे प्रवेश देण्यात येणार आहे. गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही विशेष काळजी घेण्यात आली आहे. सोलापूर येथील प्रॅक्टो क्लिनिकच्या वतीने प्रथमोपचार पेट्यांमध्ये आवश्यक असणारी औषधे प्राप्त झाली आहे. तसेच उष्माघात टाळण्यासाठी जठड ऐवजी ज्युस टेट्रापॅकचे वाटप करण्यात येणार आहे. स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून दर्शन मंडपात पिण्याच्या पाण्याचे वाटप केले जाणार आहे.




दर्शन मंडप व मंदिर परिसरात प्रकाशयोजना, फॅन, कुलर व एअर कुलिंग व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे.

गाभाऱ्यातील एअर कुलिंग प्लांटचे सर्व्हिसिंग पूर्ण झाले असून, जनरेटर व अग्निशमन यंत्रणाही सज्ज ठेवण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी दिशादर्शक व सूचनादर्शक डिजिटल फलक बसविण्यात आले आहेत. तसेच अनाउन्समेंट सिस्टीमद्वारे वेळोवेळी सूचना देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात आली आहे.

ग्रामीण भागातून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता ३१ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत रेफरल दर्शन पास बंद ठेवण्यात आले आहेत. तसेच ३१ मार्च ते २ एप्रिल दरम्यान विशेष देणगी दर्शन पास (रु. ५००) बंद राहतील.

सुरक्षा यंत्रणा, बॅग स्कॅनर, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच ऑनलाइन व ऑफलाइन पास प्रणाली सुरळीतपणे कार्यरत राहील यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली आहे. नियंत्रण कक्षात मधून आवश्यक त्या सूचना देऊन गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी सूचना देण्यात येणार आहेत.

चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त येणाऱ्या सर्व भाविकांनी स्वतःच्या आरोग्याची व सुरक्षेची काळजी घ्यावी, तसेच मंदिर व परिसरात स्वच्छता राखून सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात येत आहे.

## डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात मूट कोर्ट स्पर्धा




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मार्च -**

येथील डॉ. बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयात मूट कोर्ट स्पर्धेचे यशस्वी आयोजन सोमवारी (दि. ३०) करण्यात आले. प्राचार्य डॉ. कायला कृष्ण मुर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. डॉ. संजय आंबेकर व सहसमन्वयक प्रा. कैलास शिकारे यांनी स्पर्धेचे नियोजन केले.

स्पर्धेचे उद्घाटन डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.व्ही.जी. शिंदे होते. उद्घाटनप्रसंगी डॉ. अभय शहापूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर पारितोषिक वितरण समारंभाला अतिरिक्त जिल्हाधिकारी ज्योती पाटील उपस्थित होत्या.

स्पर्धेत महाविद्यालयातील १६ संघांनी सहभाग नोंदवला. विविध अभिरूप न्यायालयांमध्ये झालेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत सुशांत मिंधे, मयुरी राजेनिंबाळकर व प्रतीक्षा शिराळ यांच्या संघाने विजेतेपद पटकावले, तर ऋषिकेश जाधव, गणेशसिंग किल्लेदार व अभिषेक मोरे यांच्या संघाने उपविजेतेपद मिळवले. उत्कृष्ट युक्तिवादासाठी ऋषिकेश जाधव याला प्रथम क्रमांकाचा सन्मान देण्यात आला.

स्पर्धेसाठी धाराशिव न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञांनी न्यायाधीश म्हणून कामकाज पाहिले. तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सार्थक सुरवसे व सुशांत मिंधे यांचा गौरव करण्यात आला.

## गोरोबाकाकांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त नियोजन बैठक संपन्न

**विकास भोरे**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

संत परीक्षक श्री गोरोबा काकांचापुण्यतिथी सोहळा व यात्रा महोत्सव १२ ते १६ एप्रिल या यादरम्यान होत आहे. त्या निमित्ताने ३० मार्च रोजी गोरोबाकाकांच्या समाधी स्थळी नायब तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे नियोजन करण्यात आले होते.

तेर हे गाव गोरोबा काकांच्या समाधी स्थळांमुळे प्रति पंढरपूर तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. संत परीक्षक गोरोबा काकांचा ७०९ वा पुण्यतिथी सोहळा चैत्र वैद्य १० (दशमी) ते चैत्र वैद्य १४ (चतुर्दशी) म्हणजेच रविवार दि.१२ ते १४ एप्रिल या कालावधीत संपन्न होणार आहे.

या महोत्सवासाठी राज्यभरातून शंभरावर पाई वारकरी दिंड्या व भाविक मोठ्या संख्येने गोरोबाकाकांच्या समाधी स्थळाचे



दर्शन घेण्यासाठी तेरमध्ये दाखल होत असतात. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या उपाय योजनेवर नायब तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली व मंदिर ट्रस्टच्या प्रशासक सह धर्मादाय आयुक्त रूपाली कोरे, निरीक्षक अतुल नळणीकर व तेर ग्रामपंचायतच्या सरपंच दीदी काळे उपसरपंच श्रीमंत फंड यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चा करून नियोजन करण्यात



आले.

यात्रा कालावधीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न न उद्भवण्यासाठी धाराशिवचे पोलीस अधीक्षक व ढोलकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली छेडछाड व अवैध विरोधी कारवाई करण्यासाठी दोन पथकांची नियुक्ती करून २५० पोलिसांचा ताफा तैनात राहणार आहे.

तेर ग्रामपंचायत च्या वतीने मोबाईल टॉयलेट पाण्याचे ५ टँकर, येणाऱ्या भाविकांना आंघोळीसाठी बाथरूम, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, कचरा व्यवस्थाप ना बरोबरच यात्रा परिसरात सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. आरोग्य विभागाकडून २४ तास ओपीडी, यात्रा परिसरात दोन आरोग्य बुथासह ३२ कर्मचाऱ्यांचा स्टाफ, दोन म्बुलन्स व आणि तेर ग्रामीण रुग्णालयात उष्माघात कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

धाराशिव व लातूर महामंडळाच्या वतीने २५ जादा बसेस सोडण्यात येणार आहेत. पाटबंधारे विभागाच्या वतीने तेरणा नदी पात्रात पाणी सोडण्यात येणार आहे.

महावितरणच्या वतीने २४ तास लाईट पुरवठा करण्यात येणार आहे. आपत्ती व्यवस्थापन करण्यासाठी दोन पॉईंट देण्यात आले असून अन्न व औषध प्रशासन यांची यात्रा महोत्सवावर करडी नजर राहणार आहे.

मंदिर ट्रस्टच्या वतीने सुलभ दर्शन रांगा, दर्शन रांगेत कुलर, फॅनची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्थे बरोबरच मंदिरात व मंदिर परिसरात अनुचित प्रकार घडू नये म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून लक्ष ठेवणार असल्याचे प्रशासक सह धर्मादाय आयुक्त रूपाली कोरे यांनी सांगितले.

यावेळी विविध विभागातील शासकीय अधिकारी राजकीय पदाधिकारी ग्रामस्थ व वारकरी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते

## खड्ड्यांनी ग्रासला कळंब-आथर्डी महामार्ग; अपघाताचा धोका वाढला

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ मार्च -**

कळंब ते आथर्डी या राज्य महामार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून रस्ता शोधावा की खड्डे टाळावेत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे.

डीडी वन साखर कारखान्याकडे जाणाऱ्या ऊस वाहतुकीमुळे या मार्गावर जड वाहनांची सतत वर्दळ असते. पावसामुळे रस्त्याचे मोठ्या




प्रमाणात नुकसान होऊन संपूर्ण रस्ता उखडला आहे. परिणामी वाहनांचे नुकसान व किरकोळ अपघातांची संख्या वाढली आहे.

याशिवाय रस्त्यालगत वाढलेल्या बाभळीच्या काटेरी फांद्या थेट रस्त्यावर आल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी हा धोका अधिक वाढत असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केवळ मुरूम टाकून खड्डे बुजवण्याचा तात्पुरता प्रयत्न केला जात असून डांबरीकरण न झाल्याने परिस्थिती पुन्हा पूर्ववत होत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी रस्त्याचे कायमस्वरूपी डांबरीकरण करावे, खड्डे तात्काळ दुरुस्त करावेत तसेच झाडाझुडपांची छाटणी करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## नवोदय विद्यालयात महावीर जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

येथील नवोदय विद्यालयात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती मंगळवारी (दि.३१) उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात वरिष्ठ अध्यापक चक्रपाणी गोमारे यांच्या हस्ते भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विलास राऊत, हरी जाधव, परेश भाटिया, विद्या जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यार्थी ओम सरडे याने महावीरांच्या बालपणाविषयी माहिती देत त्यांच्या कार्याची ओळख करून दिली. सामाजिक शास्त्राचे अध्यापक परेश भाटिया यांनी महावीरांच्या पंचसूत्रांचा अवलंब करून शांततामय जीवन जगण्याचे आवाहन केले.

## कळंब येथे महावीर जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.३१ मार्च -**

महावीर जयंती निमित्त जैन मंदिर मध्ये भगवान महावीर चा अभिषेक, पाळणा सोहळा संपन्न झाला.

महावीर जयंती मिरवणुक जैन मंदिर, विठ्ठल मंदिर, बँक रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक, अहिल्यादेवी होळकर चौक, स्वातंत्र्य विनायक सावरकर चौकातून देवी रोड येथून जैन मंदिर येथे संपन्न झाली यावेळी सामाजिक संदेशाचे दर्शन झाले. जगाला 'जिओ और जिने दो'चा संदेश देणाऱ्या भगवान महावीर यांची जयंती कळंब येथे रविवारी साजरी



करण्यात आली. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने काढलेल्या मिरवणुकीतून जैनबांधवांनी सामाजिक एकोपा, अहिंसा, पर्यावरण संवर्धन, पाणी वाचवा, बेटी बचाव, शाकाहार याबाबत जनजागृती केली. सकल जैन समाजातर्फे गेल्या अनेक वर्षांपासून कळंब येथे महावीर जयंतीचा उत्सव एकत्रितपणे साजरा केला जातो. चौकाचौकात पिण्याचे पाणी, सरबत व्यवस्था करण्यात आली होती.

मिरवणुकीनंतर सकल जैन समाजासाठी कंगळे परिवार कडून महाप्रसाद ठेवण्यात आला होता. उत्सवासाठी समितीचे हर्षद अंबुरे, संजय देवडा,बाबुशेठ लोढा, संतोष एखंडे, अनिल नाकील, अमोल बाभळे, लक्ष्मीकांत राम यश सुराणा, अमोल लोढा, रोहन पारख, सुनील नाकील आदींसह पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

## अमृता पुजारी ठरली महिला महाराष्ट्र केसरी






### सोलापुरात रंगली थरारक अंतिम लढत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मार्च -**

सेरेंटिका रिन्युएबल्सच्या सहप्रायोजकत्वाखाली पार पडलेल्या चौथ्या महिला महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरच्या अमृता पुजारी हिने दमदार कामगिरी करत महाराष्ट्र केसरीचा मान पटकावला. अंतिम लढतीत तिने वेदिका सासनेवर ७-० अशा फरकाने विजय मिळवला.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ आणि निर्झरा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेची अंतिम लढत चित्तथरारक ठरली.

अमृताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत पहिल्या सत्रात ५-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या सत्रातही संयमी खेळ करत तिने विजय निश्चित केला.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विजेत्या अमृता पुजारी हिला चांदीची गदा, रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व सोनेट कारची चावी प्रदान करण्यात आली. उपविजेत्या वेदिका सासनेला २५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व बुलेट देण्यात आली.

विजयानंतर अमृताचा जल्लोषात सत्कार करण्यात आला. समर्थक महिला कुस्तीपटूंनी तिला व प्रशिक्षक दादासो लवटे यांना खांद्यावर घेत हलगीच्या गजरात मिरवणूक काढली व फटाक्यांची आतषबाजी केली.

स्पर्धेस विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले.

दरम्यान, महिला कुस्ती स्पर्धेसाठी राज्य शासनाने ५० लाख रुपयांचा निधी द्यावा, असा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सादर करणार असल्याची घोषणा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.

ऐन उन्हाळ्यातही आयोजकांनी फॅन, कुलर व एलईडी स्क्रीनची उत्तम व्यवस्था केल्याने स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. महिला प्रेक्षकांची उपस्थितीही उल्लेखनीय होती.

## हनुमान जयंती व शंभु महादेव यात्रा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

### उंडरगावात १ ते ४ एप्रिल दरम्यान यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३१ मार्च -**

लोहारा तालुक्यातील उंडरगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही हनुमान जयंती व शंभु महादेव यात्रा महोत्सव १ ते ४ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा होत आहे.



१ एप्रिल रोजी सायंकाळी ९ वा. सचिन बोधले (पुणे) यांचा हारीजागर होणार आहे. २ एप्रिल रोजी सकाळी गुलाल उधळणे, सायंकाळी ७ वाजता आकर्षक दारुची आतिषबाजी आणि त्यानंतर हभप. शंकर महाराज शेवाळे (जुन्नर, पुणे) यांचे कीर्तन होईल. ३ एप्रिल रोजी सकाळी श्रींची पालखी व शंभु महादेव कावड मिरवणूक, दुपारी जंगी भारुड, तर रात्री ९ वाजता 'मंगळसूत्र' हे तीन अंकी नाटक सादर करण्यात येणार आहे. ४ एप्रिल रोजी सकाळी पुढील वर्षाच्या यात्रेचा लिलाव, दुपारी ३ वाजता जंगी कुस्त्यांचा फड आणि रात्री मयुरी उतेकर (मुंबई) यांच्या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उंडरगाव ग्रामस्थांनी केले आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ५ एप्रिल रोजी मोफत मेंदूविकार तपासणी व औषधी वाटप शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च :** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या संकल्पनेतून मेंदूविकार असणाऱ्या बालकांसाठी मोफत तपासणी व औषधी वाटप करण्याची विशेष योजना जिल्हा परिषदेच्या ५ टक्के दिव्यांग राखीव निधीतून सन २०२५-२०२६ या वर्षात हाती घेण्यात आली आहे. या योजनेतंर्गत आरोग्य विभाग, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद लातूर व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगजनांच्या मेंदूविकार आजारावर उपचार करण्यासाठी किनगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रविवार, ५ एप्रिल २०२६ रोजी एका विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ मेंदूविकार तज्ज्ञांमार्फत लाभार्थ्यांची मोफत तपासणी व उपचार करून आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. तरी अहमदपूर, उदगीर व चाकूर परिसरातील मेंदूविकार असणाऱ्या लाभार्थ्यांनी या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### माणुसकीच्या पुढाकारा मुळे गरजवंतांच्या मोफत नेत्र शस्त्रक्रिया संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल व सोवर्णा फाउंडेशन (लातूर विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने उदगीर च्या उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयात २० गरजवंत रुग्णाच्या डोळ्यांची मोफत शस्त्रक्रिया पार पडली. रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलकडून सातत्याने आरोग्यासाठी घेण्यात येते असलेल्या यशस्वी पुढाकारामुळे सोवर्णा फॉउंडेशन (लातूर विभाग ) ने मदतीचा हात पुढे करीत रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल सोबत संयुक्त रित्या हा प्रकल्प हाती घेतला. या शिबिरात जवळपास लातूर जिल्ह्यातील विविध तालुक्यातून आलेल्या ७५ रुग्णांची नेत्र तपासणी झाली. दिनांक २९ मार्च २०२६ रोजी २० रुग्णाच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.या शिबीरास उदयगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटिया यांनी रोटरी च्या कार्याचे भरभरून कौतुक केले. प्रकल्पाची इत्यंभूत माहिती विशाल जैन यांनी दिली. तर प्रोजेक्ट चेअरमन विशाल तोंडचिरकर यांनी रुग्णांच्या डोळ्यातील चमक व चेहऱ्या वरील आनंद हिच सेवा प्रमाण मानत, सोवर्णा फॉउंडेशन ( लातूर विभाग) व लायन्स क्लब उदगीर यांच्या सहकार्याने भविष्यात देखील अशे प्रकल्प हाती घेऊन गरजवंतांच्या आयुष्याला कलाटणी देण्याचे वचन दिले. यावेळी रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हलकीकर,रवींद्र हसरगुंडे,व्यंकट कणसे, गणेश जाधव यांच्या सह लॉयन्स क्लबचे डॉक्टर्स, कर्मचारी उपस्थित होते.

### मराठवाड्यात प्रथमच! - शहरातील डॉक्टरांनी IIT कानपूरकडून AI इन हेल्थकेअर प्रमाणपत्र

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर :** मराठवाड्यातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अभिमानास्पद अशी एक ऐतिहासिक कामगिरी करत, उदगीर येथील रहिवासी असलेल व छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत असलेले डॉ. अजय वसंत रोट्टे यांनी Artificial Intelligence in Healthcare या विषयातील विशेष प्रमाणपत्र ए ICT Academy, IIT कानपूर कडून यशस्वीरित्या पूर्ण केले असून, हा मान मिळवणारे ते मराठवाड्यातील पहिले आणि एकमेव डॉक्टर ठरले आहेत. जगभरात आरोग्यसेवेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (-AI) वाढता प्रभाव लक्षात घेता, ही कामगिरी केवळ वैयक्तिक न राहता संपूर्ण प्रदेशासाठी एक मोठी झेप मानली जात आहे. डॉ. रोट्टे हे वरिष्ठ डायबेटॉलॉजिस्ट, एंडोक्रिनोलॉजिस्ट तसेच हेल्थकेअर क्वालिटी क्षेत्रातील तज्ज्ञ असून, त्यांनी नेहमीच Patients First या तत्त्वावर आधारित नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. आता AI च्या माध्यमातून ते आरोग्यसेवेला अधिक अचूक, जलद आणि परिणामकारक बनवण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहेत.



भविष्यातील वैद्यकशास्त्र हे रोग ओळखण्यापेक्षा त्यांची पूर्वकल्पना आणि प्रतिबंध यावर आधारित असेल-आणि AI हे त्याचे मुख्य साधन ठरणार आहे, असे डॉ. रोट्टे यांनी सांगितले.

हे प्रमाणपत्र भारत सरकारच्या Ministry of Electronics and Information Technology (MeitY) आणि IIT कानपूर यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येते. या अभ्यासक्रमामध्ये predictive analytics, clinical decision support systems आणि आधुनिक आरोग्य व्यवस्थापन यांसारख्या प्रगत संकल्पनांचा समावेश आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी या यशाचे कौतुक करताना म्हटले आहे की, यामुळे मराठवाड्यातील रुग्णालयांमध्ये AI आधारित प्रणालींचा वापर वाढेल, रुग्ण सुरक्षितता अधिक मजबूत होईल आणि उपचारांची गुणवत्ता उंचावेल. त्यांच्या या यशाबद्दल मराठवाडा सह उदगीर परिसरात कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** लातूर शहरातील जयभीमनगर येथील महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्षपदी शंकर गायकवाड, उपाध्यक्षपदी अजय जोगेश्र्वरी तर सचिवपदी सारनाथ सोनकांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. जयभिम नगर येथील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सदरची कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध कार्यक्रम आणि उपक्रम घेऊन मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे यावेळी ठरले. उर्वरित कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे. जयंती मंडळाच्या कोषाध्यक्षपदी निलेश गायकवाड, सहसचिव चेतन वाघमारे सहकोषाध्यक्ष आकाश ढगे सल्लागार संग्राम वाघमारे, सचिन फुले, अविनाश सूर्यवंशी, मार्गदर्शक अविनाश बर्गे भैया, विशाल भाऊ गवळी अभिमन्यू तात्या लामतुरे, मारुती चक्रे, किशोर कांबळे यांची निवड करण्यात आली. यावेळी तनुजा कांबळे, अनिल क्षिरसागर, राहुल बनसोडे, सुहास सोनकांबळे लखन पात्रे, विलास सातपुते बाबासाहेब थोरात दिलीप सातपुते आदींची उपस्थिती होती.

# मानसरंग नाट्य महोत्सवाने जिंकली लातूरच्या नाट्य रसिकांची मने

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च :** लातुरात सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च लातूरच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त सोसायटी फॉर वेल बी इंग अवेअरनेस अँड रिहॅबिलिटेशन अर्थात स्वर च्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानसरंग नाट्य महोत्सव मोठ्या दिमाखदारपणे संपन्न झाला. या नाट्य महोत्सवाला लातूरच्या रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रत्येक नाटकासाठी जवळपास ६०० पेक्षा जास्त प्रेक्षक उपस्थित होते.

मानसिक आरोग्यविषयक विविध विषयांना स्पर्श करणारी चार नाटके या महोत्सवामध्ये सादर करण्यात आली. सकाळी ११ वाजता या नाट्यमहोत्सवाचा उद्घाटन समारंभ डॉ. मिलिंद पोतदार यांच्या मातोश्री शालिनी पोतदार व प्रख्यात दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांच्या हस्ते नटराज पूजन व दीप प्रज्वलन करून संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ बालरोग तज्ञ डॉ. अशोक आरदवाड, श्रुतिकांत ठाकूर, संजय अयाचित, धनंजय बेंबडे आदी मान्यवर उपस्थित होते. मुग्धा पोतदार यांनी नाट्य महोत्सवाचे प्रास्ताविक केले. आरोही पोतदार हिने सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली.

या महोत्सवाचे पहिले पुष्प नाट्य स्पंदन प्रतिष्ठान लातूर द्वारा निर्मित श्रुतिकांत ठाकूरद्वारा दिग्दर्शित 'आनंद ओवरी' हे नाटक सादर झाले. डॉ. मिलिंद पोतदार यांनी यामध्ये तुकारामाचा लहान भाऊ कान्होबाची भूमिका सादर केली. नाटकानंतर झालेल्या चर्चेमध्ये डॉ. अनघा राजपूत यांनी डॉ. मिलिंद पोतदार व श्रुतीकांत ठाकूर यांच्याशी संवाद साधला व मानसिक आरोग्याशी निगडित सविस्तर चर्चा करण्यात आली.





दुपारी सादर झालेले दुसरे नाटक 'मन 'अभिजीत झुंजारराव यांनी दिग्दर्शित केलेले व रमेश वाणी या समर्थ अभिनेत्याने सादर केलेले हे एकपात्री नाटक सादर झाले. एका निळकंठ नावाच्या सामान्य माणसाच्या जीवनप्रवासातील त्याच्या मनात कारणांनी चाललेला विचारांचा गोंधळ भावनांचा, त्याच्या वैयक्तिक,कौटुंबिक आणि सामाजिक जीवनावर होणारा परिणाम प्रेक्षकांसमोर मांडला. नाटकानंतर डॉ. मिलिंद पोतदार यांनी अभिजित झुंजारराव व रमेश वाणी यांच्याशी संवाद साधला.

नाट्यमहोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी सादर झालेले तिसरे नाटक प्रख्यात अभिनेत्री विभावरी देशपांडे लिखित व दिग्दर्शित 'मग तू मला खा' हे सादर करण्यात आले. आजच्या युगातील मुले व तरुण यांच्यामध्ये स्वतःच्या दिसण्याबद्दल स्वतःच्या शरीरयष्टी बद्दल असणारे अनेक समज - गैरसमज, स्वतः च्या इमेज बद्दलच्या संकल्पना समाज माध्यमांवर उमटणाऱ्या प्रतिक्रियांचा त्याच्यावर होणारा परिणाम याच्यावर हे नाटक अत्यंत परिणामकरीत्या भाष्य करते. नववी दहावी या वर्गामध्ये असलेली मुले मुली आपल्या दिसण्याबद्दल कशी

चुकीच्या पद्धतीने संकल्पना बाळगतात व त्यामुळ त्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये कसे टोकाचे नकारात्मक बदल होत जातात व त्यातून आत्मविश्र्वास गमावून बसल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कसे परिणाम होतात हे अत्यंत प्रभावीपणे या नाटकामध्ये मांडण्यात आले. या अनुषंगानेच नाटकानंतर नाटकातील सर्व कलाकारवृंद तसेच डॉ. वर्षा पाटील वरिष्ठ मानसोपचार तज्ञ लातूर यांच्याशी डॉ. मिलिंद पोतदार यांनी संवाद साधला व आपले असणे व दिसणे याल कसे महत्त्व द्यायला हवे व स्वतःबद्दलच्या संकल्पना कशा विकसित करायला हव्यात याबद्दल चर्चा केली

त्यानंतर दुपारी सादर झालेले दत्ता पाटील लिखित सचिन शिंदे दिग्दर्शित 'तू राजहंस एक' हे नाटक सर्वांच्या काळजाचा ठाव घेऊन गेले. नंतर झालेल्या चर्चेमध्ये डॉ. मिलिंद पोतदार यांनी लेखक व अभिनेत्यांशी संवाद साधला.

महोत्सवाच्या शेवटी डॉ. मिलिंद पोतदार यांनी या महोत्सवाच्या आयोजनामध्ये व यशस्वीतेमध्ये सहभाग नोंदवलेल्या सर्व संस्था व्यक्ती हॉस्पिटल मधील स्टाफ व या कार्यक्रमांमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करणारे विविध विद्यालय - महाविद्यालयातील ५० विद्यार्थी यांच्या प्रति ऋण व्यक्त केले. हा मानसरंग नाट्य महोत्सव लातूरच्या सांस्कृतिक इतिहासामधील एक मैलाचा दगड ठरावा या पद्धतीने याची आखणी केली गेली होती. प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद तसेच मनोरंजनातून सामाजिक भान जागविण्याचे उत्तम उदाहरण म्हणून या नाट्य महोत्सवाकडे पाहता येईल डॉ.मिलिंद पोतदार व मुग्धा पोतदार यांच्या संकल्पनेतून व अनेकांच्या सहकार्यातून हा यशस्वी नाट्य महोत्सव उभा राहिला. असे सांस्कृतिक कार्यक्रम लातूरमध्ये वारंवार होत राहावेत व त्यातून समाजप्रबोधनाचा एक नवीन पायंडा पडावा अशी अपेक्षा डॉ. मिलिंद पोतदार यांनी व्यक्त केली.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांचा दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च :** जिल्हाधिकारी म्हणून कर्तव्यदक्षपणे कार्य करत असलेल्या श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे यांना ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दयानंद कला महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते वर्षा ठाकूर-घुगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांची उपस्थिती होती. राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये कार्यालयाचे संकेतस्थळ, 'आपले सरकार' प्रणाली, ई-ऑफिस, कार्यालयाचा डॅशबोर्ड, व्हॉट्सप चॅटबॉट, कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन तसेच भौगोलिक माहिती प्रणाली अशा सात महत्त्वाच्या घटकांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले.



या विशेष मोहिमेअंतर्गत दोन टप्प्यांमध्ये झालेल्या मूल्यमापनानंतर राज्यातील ३६ जिल्हाधिकारी कार्यालयांमधून लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्यात चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. ही संपूर्ण लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

## लातूर जिल्ह्यात १ एप्रिलपासून चार विशेष डिजिटल शेती शाळा; कृषी विभाग व पाणी फाउंडेशनचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोकरा) अभियान स्वरूपात राबवण्यात येणाऱ्या हवामान अनुकूल तंत्रज्ञान उपक्रमांतर्गत, लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेती शाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विभाग आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने हे प्रशिक्षण पार पडणार असून, जिल्ह्यातील प्रत्येक गावातील किमान ३० ते ४० शेतकऱ्यांनी यात ऑनलाईन पद्धतीने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

पाणी फाउंडेशनद्वारे संचलित ही डिजिटल शेती शाळा एक प्रगत ऑनलाईन व्यासपीठ असून, याद्वारे तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना पीकनिहाय शास्त्रोक्त मार्गदर्शन झूम आणि युट्युब च्या माध्यमातून दिले जाणार आहे. या उपक्रमात कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक, तसेच कृषी ताई व कृषी सखी यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. गावनिहाय नियोजन करून एका मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्रित उपस्थित राहावे, यासाठी कृषी विभागाने जय्यत तयारी केली आहे.

या विशेष शेती शाळांचे वेळापत्रक चार भागांत विभागले असून, त्याचे सत्र निश्र्चित केलेल्या दिवशी सायंकाळी ७:३० वाजता सुरू होईल. याची लिंक गावनिहाय व्हॉट्सप ग्रुपद्वारे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या भागात १ एप्रिल रोजी पेरणीपूर्व तंत्रज्ञान, बेड तयार करणे, टोकण पद्धत, आंतरपीक आणि बीजप्रक्रिया यावर मार्गदर्शन होईल. दुसऱ्या भागात ८ एप्रिल रोजी बीजामृत, जिवामृत आणि दशपर्णी अर्क यांसारख्या जैविक व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीवर भर दिला जाईल. तिसऱ्या भागात १५ एप्रिल रोजी एकात्मिक कीड व्यवस्थापन, सापळा पिके आणि मित्र कीटकांचा वापर यावर चर्चा होईल, तर चौथ्या भागात २२ एप्रिल रोजी भात शेती लागवडीचे आधुनिक तंत्र व यांत्रिकीकरण याविषयी सविस्तर माहिती दिली जाणार आहे. तरी जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या डिजिटल शेती शाळेचा लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# तांबळा येथे कार्ड क्लबवर सशस्त्र दरोड्याची घटना - कासार शिरसी पोलिसांची तत्पर कारवाई; एक आरोपी जेरबंद, इतरांचा शोध सुरू

**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. ३१ मार्च :**

निलंगा तालुक्यातील कासार शिरसी पोलीस ठाणे हद्दीत तांबाळा येथील ब्रिक यार्ड स्पोर्ट कार्ड क्लब मध्ये सोमवार दि. ३० रोजी रात्री सुमारे ९:३० वाजताच्या सुमारास अज्ञात आरोपींकडून दरोड्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी कासार सिरसी पोलीस ठाण्यात गुरनं ५५/२०२६ कलम ३१० (२), ३११ भारतीय न्याय संहिता (इछड) व सहकलम ३/२५ भा. ह. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


या प्रकरणी फिर्यादीने यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पाच अनोळखी आरोपींनी क्लबमध्ये घुसून बंदुकीचा धाक दाखवत दहशत निर्माण करून रोख रक्कम व मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेत सशस्त्र दरोडा टाकला.

या घटनेची माहिती कासार शिरसी पोलिसांना मिळताच कासार शिरसी पोलिसांकडून सदर बाब तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कासार शिरसी पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ परिसरात नाकाबंदी करून आरोपींचा शोध सुरू केला. कासार शिरसी पोलीस ठाण्याचे प्रभारी स.पो.नि. श्री प्रवीण राठोड यांनी तात्काळ पोलीस स्टेशन औराद शहाजनी, किल्लारी, निलंगा, औसा ,उमरगा व पोलीस स्टेशन बसवकल्याण राज्य कर्नाटक या पोलीस ठाण्याशी तात्काळ संपर्क साधून घडलेल्या घटनेची माहिती देऊन नाकाबंदी करणेबाबत माहिती दिली.

दरम्यान, दरोड्यात वापरण्यात आलेली संशयित विना नंबर इनोव्हा गाडी भरधाव वेगाने शिराढोण कडे पळून जात असल्याची पोलिसांना माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून शिराढोण पाटी येथील नाकाबंदी पॉईंटवर सदर वाहन ३१ मार्च २०२६ चे मध्यरात्री १२ वाजताचे सुमारास अडविले. त्यावेळी आरोपीनी पोलिसांच्या खाजगी वाहनाला धडक दिली व वाहनातून उतरून अंधाराचा फायदा घेत पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना पोलिसांनी एका आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव कार्तिक कलाप्पा भोकले (वय २७ वर्ष, रा. भूसनी वाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) असे असून त्याने आपल्या इतर चार साथीदारांसह सदर दरोड्यात सहभाग असल्याची कबुली दिली आहे. त्याच्या ताब्यातून वाहन, मोबाईल फोन तसेच दरोड्यासाठी वापरण्यात आलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे.

ही कारवाई दिनांक ३० मार्च रोजी रात्री सुमारे १०:०० ते दिनांक ३१ मार्च चे मध्यरात्री १२:३० या कालावधीत अत्यंत तत्परतेने पार पाडण्यात आली. घटनास्थळी अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा श्री. ढुमे, उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर श्री. रायबोले, स्थानिक गुन्हे शाखा प्रभारी अधिकारी श्री सुधाकर बावकर तसेच इतर वरिष्ठ अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी करून पुढील तपास कामी मार्गदर्शन केले.

सदर प्रकरणातील फरार चार आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा तसेच कासार शिरसी पोलीस ठाण्याच्या अधिकारी अमलदारांचे चार विशेष पथके तयार करून रवाना करण्यात आली आहेत.



सदर घटनेची माहिती मिळाल्यापासून तत्काळ अवघ्या काही तासातच पोलीस ठाणे कासार सिरसीचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे, पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील, पोलीस अंमलदार राजू हिंगमिरे, हरि डावरगावे, आबा इंगळे, किशोर तपसे, शंकर बुडे, मनोज चव्हाण, श्रीनिवास देशमुख, नवनाथ इंदापुरे आदींनी संयुक्तरित्या ही कारवाई केली.